महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय,
कोंढवा-येवलेवाडी,पुणे महानगरपालिका.
कार्यालयाचा पत्ता :- जे.एस.पी.एम.बिल्डींग मागे,
सावंत कॉर्नर,कात्रज, पुणे-४६.
कार्यालयाचा संपर्क क्र.:- ०२०-२५५०८८००
ईमेल :kondhwa@punecorporation.org
विस्तारित क्रमांक :- ०२०-२५५०८८०२/०३
जावक क्र. :- 200६ दिनांक :- १६/९/२०२०

अपिल प्राधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त कोंढवा-येवलेवाडी
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
अपिल क्र.:अ.प्रा.तथा महा.सहा.आयुक्त कार्यालय कोंढवा-येवलेवाडी /पुणे मनपा/अपिल/दि.१५/०९/२०२०

१. अपिलकर्ता श्री.दिपक अमृत शेलकर,
राहणार :- तारा अपार्टमेंट, फ्लॅ.नं.६,
महर्षीनगर, गुलटेकडी पुणे ३७.

२. जन माहिती अधिकारी तथा,
उप अधिक्षक,कोंढवा-येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालय,
पुणे महानगरपालिका.

श्री दिपक अमृत शेलकर
विरूध्द
जनमाहिती अधिकारी तथा उप अधिक्षक, कोंढवा-येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगरपालिका.

---

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये अपिल**

अपिलकर्ता श्री दिपक अमृत शेलकर यांनी दिनांक १८/०६/२०२० रोजी जनमाहिती अधिकारी तथा उप अधिक्षक, कोंढवा-येवलेवाडी, पुणे महानगरपालिका यांचेकडे १ जानेवारी २०१९ ते १५ जून २०२० या कालावधीतील बालाजीनगर, पवार हॉस्पिटल येथील भाजी-फळे तसेच विविध साहित्य विकणाऱ्या हातगाडी धारकांबाबत माहिती मिळणेकामी अर्ज केला होता.

अर्जदाराने अर्जामधील मुद्दा क्र.१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कार्यालयाकडील उपलब्ध माहितीचे ८ पृष्ठे असून प्रती पृष्ठ २/- रुपये प्रमाणे एकूण १६/- रु. रक्कमेचा भरणा केलेनंतर माहिती उपलब्ध करून दिली जाईल. तसेच मुद्दा क्र.२ ते ४ मध्ये विचारलेली माहिती मा.जन माहिती अधिकारी, अतिक्रमण व अनाधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग, मुख्य खात्याशी संबंधीत असलेचे पत्र जा.क्र.९६६ दि.२६/६/२०२० अन्वये कळविले असल्याचे जनमाहिती अधिकारी तथा उप अधिक्षक, कोंढवा-येवलेवाडी, पुणे महानगरपालिका यांनी सांगितले.

माहिती अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकाऱ्याने उपलब्ध करून दिलेली माहिती व इतर पत्र व्यवहारासंबंधी माहिती खालीलप्रमाणे आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| माहिती अधिकारातंर्गत अर्ज सादर केल्याचा दिनांक | माहिती उपलब्ध करून द्यावयाचा अंतिम दिनांक | अपिलार्थी उत्तर पाठविल्याचा दिनांक | अर्जदाराने शुल्क भरल्याचा दिनांक | अर्जदारास माहिती दिल्याचा दिनांक |
| १८/०६/२०२० | १७/०७/२०२० | २६/६/२०२० | १०/०८/२०२० | १०/०८/२०२० |

प्रथम अपिल अर्ज दाखल करण्याचे कारण पुढीलप्रमाणे - अपूर्ण माहिती मिळाली असल्याचे नमूद केले आहे.

| प्रथम अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रथम अपिल अर्ज दाखल करावयाचा अंतिम दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज मुदतीत दाखल केला आहे का ? | प्रथम अपिलाच्या विलंबाबाबत निवेदन दिले आहे का ? | प्रथम अपिल सुनावणी सुचना पाठविल्याचा दिनांक |
| ०९/०९/२०२० | २६/०८/२०२० | होय | - | ११/०९/२०२० |

प्रथम अपिल सुनावणी दिनांक व वेळ :- दि. १५/०९/२०२० रोजी सकाळी ११.३० वाजता.
सुनावणीस अपिलकर्ता :- उपस्थित
सुनावणीस अपिलकर्ता प्रतिनिधी म्हणून श्री.भरत जैन(सुराणा) :- उपस्थित
सुनावणीस जनमाहिती अधिकारी :- उपस्थित

जनमाहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | अर्जदाराने मागितलेली माहिती | जनमाहिती अधिकाऱ्याने दिलेले उत्तर/माहिती |
|---|---|---|
| १ | १ जानेवारी २०१९ ते १५ जून २०२० या कालावधीतील बालाजीनगर, पवार हॉस्पिटल येथील भाजी-फळे तसेच विविध साहित्य विकणाऱ्या हातगाडी धारकांबाबत माहिती मिळणेकामी अर्ज केला होता. | अर्जामधील मुद्दा क्र.१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कार्यालयाकडील उपलब्ध माहितीचे ८ पृष्ठे असून प्रती पृष्ठ २/- रुपये प्रमाणे एकूण १६/- रु. रक्कमेचा भरणा केलेनंतर माहिती उपलब्ध करून दिली जाईल. तसेच मुद्दा क्र.२ ते ४ मध्ये विचारलेली माहिती मा.जन माहिती अधिकारी, अतिक्रमण व अनाधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग, मुख्य खात्याशी संबंधीत असलेचे पत्र जा.क्र.९६६ दि.२६/६/२०२० अन्वये कळविले असल्याचे जनमाहिती अधिकारी तथा उप अधिक्षक, कोंढवा-येवलेवाडी, पुणे महानगरपालिका यांनी सांगितले. |

## विवेचन

अपिलार्थी व त्यांचे प्रतिनिधी यांचे म्हणणे पुढीलप्रमाणे :-

मुद्या क्र.१ – मा.जनमाहिती अधिकारी तथा उप अधिक्षक यांनी पुर्ण माहिती दिली नाही.

मुद्या क्र.२ – अर्जात नमुद केलेप्रमाणे भाडेचे तपशील प्रत मिळाली नाही.

मुद्या क्र.३ – अर्जात नमुद केलेप्रमाणे रक्कमेची तपशील प्रत मिळाली नाही.

मुद्या क्र.४ – अर्जात नमुद केलेप्रमाणे भाड्याच्या पावत्या व दंड पावत्या तपशील प्रत मिळाली नाही.

मा.जन माहिती अधिकारी तथा उप अधिक्षक यांचे म्हणणे पुढीलप्रमाणे:-

मुद्या क्र.१ – कार्यालयाकडील उपलब्ध माहितीचे ८ पृष्ठे असून प्रती पृष्ठ २/- रुपये प्रमाणे एकूण १६/- रु. रक्कमेचा भरणा केलेनंतर माहिती उपलब्ध करून दिली जाईल असे पत्र जा.क्र.९६६ दि.२६/६/२०२० अन्वये कळविले. अर्जदाराने सदर रक्कम चलनाद्वारे भरलेनंतर अर्जदारास सदर माहिती दि.१०/०८/२०२० रोजी उपलब्ध करून दिली.

मुद्या क्र.२ ते ४ – मा.जन माहिती अधिकारी, अतिक्रमण व अनाधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग, मुख्य खात्याशी संबंधीत असलेचे जा.क्र.९६६ दि.२६/६/२०२० अन्वये अर्जदारास कळविले, तसेच मुद्या क्र.२ ते ४ ची माहिती अर्जदारास उपलब्ध करून देणेकामी मा.जन माहिती अधिकारी, अतिक्रमण व अनाधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग, मुख्य खात्याकडे जा.क्र.९६६ दि.२६/६/२०२० अन्वये अर्ज वर्ग केला असे.

## -: आदेश :-

माहिती अधिकार अधिनियम २००५ अर्तगंत दि.१८/०६/२०२० चे अर्जात नमूद केलेप्रमाणे दि.१०/०८/२०२० रोजी दिलेल्या माहिती व्यतिरिक्त कार्यालयाकडे अभिलेखे उपलब्ध असलेस अपिलार्थी यांना ३ दिवसांचे आत विनामुल्य उपलब्ध करून देण्यात यावे.

तसेच मुद्या क्र. २ ते ४ ची माहिती अर्जदारास उपलब्ध होणेकामी मा.जन माहिती अधिकारी, अतिक्रमण व अनाधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग, मुख्य खात्याबाबत आवश्यक ती माहिती(उदा.मा.जनमाहिती अधिकारी यांचे नाव, कार्यालयाचा पत्ता, कार्यालयाचा दुरध्वनी क्रमांक इ.सविस्तर तपशिल) देणेत यावी.

सबब, प्रकरण निकाली काढण्यात येत आहे.

१६/९/२०

(तानाजी नरळे)
अपिल प्राधिकारी तथा
महापालिका सहाय्यक आयुक्त,
कोंढवा-येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालय,
पुणे महानगरपालिका.

दिनांक आणि ठिकाणः १५/०९/२०२०, पुणे.

टीप :- १. सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास माहिती अधिकार अधिनियम कलम १९(३)नुसार मा.आयुक्त,राज्य माहिती आयोग,नविन प्रशासकिय इमारत,विधानभवन समोर पुणे ४११००१ यांचेकडे अपिल करता येईल.

२. प्रथम अपील सुनावणी आदेशाची प्रत सुनावणी नंतर सात दिवसांच्या मुदतीत पुणे मनपाच्या www.punecorporation.org या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल.

प्रत :-१. अपिलकर्ता श्री.दिपक अमृत शेलकर,
राहणार :- तारा अपार्टमेंट, फ्लॅ.नं.६,
महर्षीनगर, गुलटेकडी पुणे ३७.

२. श्री.अशोक महाजन,
जन माहिती अधिकारी तथा,
उप अधिक्षक, कोंढवा-येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालय,
पुणे महानगरपालिका.

यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.......